क्र.सीटीएस सीआर ८१५५ /ना.भ.४/२०१०
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख (म.राज्य) पुणे यांचे कार्यालय
नविन प्रशासकिय इमारत, २ रा मजला
विधान भवन समोर, पुणे -१
पुणे दिनांक:- ८/१२/२०१०.
- 8 DEC 2010

**विषय :- मोजणीसाठी प्राप्त होणा-या अर्जासोबत मिळकत पत्रिकेची /अधिकार अभिलेखाची प्रमाणित प्रत जोडणेबाबत.**

परिपत्रक :-

भूमि अभिलेख विभागाकडे शेत जमिन तसेच नागरी भागातील मिळकतींची मोजणी करणेबाबत अर्ज प्राप्त होतात. मोजणीसाठी प्राप्त होणा-या अर्जासोबत आवश्यक असलेल्या अधिकार अभिलेख उदा. ७/१२, मिळकत पत्रिका अशा प्रमाणीत प्रती जोडण्याच्या सूचना संबंधीत कार्यालयाकडून अर्जदारास दिल्या जातात. मोजणी अर्जासोबत ७/१२ व मिळकत पत्रिका असे अधिकार अभिलेखाची मूळ प्रमाणित प्रत अर्जदाराकडून घेण्यात यावी अशा कोणत्याही सूचना नाहीत. या बाबी विचारात घेवून खालीलप्रमाणे सूचना देणेत येत आहेत.

सर्व प्रकारचे मोजणीसाठी नगर भूमापन अधिकारी/ उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयांमध्ये प्राप्त होणाऱ्या मोजणी अर्जासोबत ७/१२ उतारा /मिळकत पत्रिका याच्या मूळ प्रमाणित प्रती जोडण्याची सक्ती अर्जदारास करु नये. तथापी अशा अर्जासोबत **नजीकच्या तीन महिन्याच्या कालावधीतील अद्यावत ७/१२ व मिळकत पत्रिका या अधिकार अभिलेखाच्या मूळ नकलेच्या प्रमाणित छायांकीत प्रती अर्जदाराकडून प्राप्त करुन घ्याव्यात.** तसेच अर्ज स्विकारतेवेळी अशा प्रमाणित छायांकीत प्रतींची पडताळणी मूळ अभिलेख /नक्कल प्रतीवरुन करण्यात यावी.

वरील सूचनांचे काटेकोरपणे अंमलबजावणी होत असल्याची खात्री नियंत्रण अधिकाऱ्यांनी करावी.

**स्वाक्षरी/-xxx**
**(डॉ. शैलेश कुमार शर्मा)**
**जमाबंदी आयुक्त आणि संचालक**
**भूमि अभिलेख(महाराष्ट्र राज्य)पुणे**

प्रत : उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (सर्वसाधारण/भूमापन/नागरी भूमापन/एकत्रीकरण) पुणे यांना माहितीसाठी.
प्रत : उपसंचालक भूमि अभिलेख सर्व यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
प्रत : प्राचार्य,भूमि अभिलेख प्रशिक्षण शाळा, औरंगाबाद यांना माहितीसाठी.
प्रत : जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख सर्व यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
प्रत : उप अधीक्षक भूमि अभिलेख सर्व /नगर भूमापन अधिकारी सर्व यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
प्रत : कार्यालय अधीक्षक सर्व जमाबंदी आयुक्त कार्यालय यांना माहितीसाठी.

"नि र्ग मि त"

उपसंचालक भूमि अभिलेख
पुणे प्रदेश, पुणे
संकलन
दिनांक 9 DEC 2010
आवक क्रमांक

(विलास पाटील)
उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न
जमाबंदी आयुक्त(नागरी भूमापन)पुणे